# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१६**

**सकाळी ११.३० वा.**

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| २ | **महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "ड" मधील वॉर्ड नं. ७६ मध्ये वालीव येथील हरमन प्लास्टिक ते निकिती गॅस कंपनीपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरणाचे कामाचे सुधारित अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. ७६ मध्ये वालीव येथील हरमन प्लास्टिक ते निकिता गॅस कंपनीपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरणाचे काम सुरु होते. परंतु सदर रस्त्याचे कामांतर्गत अतिक्रमण होते. सदर अतिक्रमण हटविल्यामुळे रस्ता रुंदीकरण झालेला भाग डांबरीकरण करणे आवश्यक आहे. कामाचे परिमाणात वाढ होत आहे. या वाढीव कामाच्या बदलानुसार सदर कामाचे रु. ४४,९९,४९४/-चे सुधारित अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यांत येत आहे. सुधारित रक्कमेच्या अंदाजपत्रकास सक्षम अधिकाऱ्याकडून तांत्रिक मंजुरी घेण्यांत यावी. तद्नंतर सदरहू काम मूळ ठेकेदाराकडून करुन घेण्यास ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील** |
| ३ | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत मंजुर रकमेतून खरेदी करण्यांत आलेल्या ११६०० नग २४० लीटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins with lid या बाबीसाठी मंजुर असलेल्या शिल्लक रकमेतून अधिकची २७३९ नग २४० लीटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins with lid मंजुर निविदाधारक मे. नीलकमल लि. यांचेकडून निविदेतील मंजुर दराने मागविणेस मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वर नमुद प्रस्तावानुसार खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे. केंद्र शासनाच्या पायाभूत सुविधा पुरविणेची योजना UIDSST अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन योजनेतील २४० लीटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins या बाबीसाठी मंजुर रक्कम रु. ५,४२,९०,०००/- मधून १२२०० नग खरेदी करुन रक्कम रु.४,४४,३०,०००/- होत आहे. शिल्लक रक्क्म रुपये ९८,६०,०००/- मधून २७३९ नग २४० लीटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins with lid मंजुर निविदाधारक मे. निलकमल लि. यांचेकडून निविदेतील मंजुर दराने म्हणजे रक्कम रु. ३६,००/- प्रतीनग याप्रमाणे मागविणे कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. मे. निलकमल लि. यांचेशी वाढीव कामासाठी संविदा करणेस ही स्थायी समिती सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील** |

| | | |
|---|---|---|
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए, बी, सी, डी व ई मधील १२ उद्यानामधील झाडांच्या व हिरवळीच्या वाढीसाठी मे. फिनोलेक्स प्लास ऑन इंडस्ट्रीज प्रा.लि. यांच्याकडून शासकीय दर करारानुसार तुषार सिंचन पध्दत बसविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावांवर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या १२ उद्यानांमध्ये प्रस्तावात नमुद असलेली योजना तातडीने राबवयाची असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूचि ड प्रकरण ५(२) (२) नुसार मा.आयुक्त यांनी निविदा न मागविता संविदा प्राधिकृत करणे विषयक तरतुद नमुद आहे. त्या अनुषंगाने मे.फिनोलेक्स प्लास ऑन इंडस्ट्रीज प्रा.लि.कडून सुक्ष्म चिंतन योजना ई-ठिंबक प्रणालीव्दारे राबविणेस सर्वानुमते मान्यता देण्यात येत असून मा.आयुक्त यांना याकामी प्राधिकृत करणेत येत आहे व सदरच्या प्रस्तावास सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरिवले सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या इस्पितळ व वैद्यकीय आरोग्य केंद्रामध्ये E-Hospital व ORS या संगणक प्रणाली राबविण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :-सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. तरी E-Hospital व ORS या संगणक प्रणाली वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या इस्पितळांमध्ये व वैद्यकीय आरोग्य केंद्रांमध्ये राबविण्यास होणाऱ्या रु. २,०१,२५०/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| ६ | प्रभाग समिती "फ" धानीव / पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पूर्व दामोदर पार्क जवळील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सांगोपांग चर्चा होऊन उपरोक्त निविदांची तुलना करता मे. पार्वती जाधव हयांची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा. आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. या कामी संविदा करणेसाठी ही सभा म.न.पा.च्या वतीने सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन मान्यता देत आहे व या कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ७ | प्रभाग समिती "ड" कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. ६३ मध्ये वालीव येथे महेंद्र शोरुम ते सुजान इंडस्ट्रिअल व निराली इंडस्ट्रिअल ते जय इंडस्ट्रिअलपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. नितेश मोहन मलवाणी यांची ६.५% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मे. नितेश मोहन मलवाणी यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कमी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरिवले सूचक :- मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील** |

| | | |
|---|---|---|
| ८ | वसई-विरार शहर महानगरपालिका नालासोपारा (प.) प्रभाग क्र. ९४ मधील निर्मळ नाक्यावर दुतर्फा रस्ता रुंदीकरण करणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- सदर कामास मा. सर्वसाधारण ठराव क्र. ११० दि. ०८/०८/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. वज्रेश्वरी एंटरप्रायजेस हयांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १६.७% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम २०११ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरिवले सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| ९ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (बी) मधील सर्वोदय वसाहत नालासोपारा (पू) येथील नागरी आरोग्य केंद्राची दुरुस्ती करणे कामी कमी दराच्या निविदाधारंकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- सदर कामास मा. स्थायी समिती ठराव क्र. २९ दि. १४/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. स्टार पेव्हर्स एंटरप्रायजेस हयांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ४.५% जादा दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| १० | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (बी) मधील रानळे तलाव, विरार पूर्व येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती व नुतनीकरण करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामास मा. स्थायी समिती ठराव क्र. २७ दि. १४/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. आकार आर्टस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १८.००% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील** |
| ११ | वसई-विरार शहर महानगरपालिका अग्निशमन कर्मचाऱ्यांना गणवेश उपलब्ध करुन मिळणे बाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश व अनुषंगिक बाबी ई-टेंडर पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व येणाऱ्या रक्कम रुपये २५,३४,९१०/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस |

| | | |
|---|---|---|
| | | लाख चौतीस हजार नऊशे दहा मात्र) पर्यंतचे खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील** |
| १२ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ६३ (नविन वॉर्ड नं.९०) मध्ये सातीवली आंबेडकर नगर येथे आरोग्य केंद्राची दुरुस्ती व नुतनीकरण करणेचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वरीलप्रमाणे विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर कामाची मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. १६२७०७२/- असून अतिरिक्त बाबी व वाढीव परिमाणावरील झालेला खर्च रक्कम रु. ३८०५९९७/- इतका होत आहे. अशा प्रकारे एकुण खर्च रक्कम रु. ५४,३३,०६९/- च्या खर्चास व विभागाने प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे.ओमकार एन्टरप्रायझेस या मंजुर निविदाधारकाकडून करुन घेतलेल्या सदरच्या कामास ही सभा कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| १३ | नवघर-माणिकपूर प्रभाग समिती एच आनंदनगर उद्यानामध्ये दिवाबत्तीची व्यवस्था करणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामास मा. स्थायी समिती ठराव क्र. १७८ दि. १०/१०/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहिर ई-निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. यश इंजिनिअरिंग हयांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ४.९५% जास्त दराची (वाटाघाटीने) निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम २०११ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील** |
| १४ | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील सांडोर हुसेली कॉलनी येथील राज अपार्टमेंट ते मुबारक अपार्टमेंट पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :- -** सदर कामास मा. स्थायी समिती ठराव क्र. २२६ दि. २०/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. नितेश मोहन मलवाणी यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ४.४५% जादा दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. वृंदेश उर्फ उमा पाटील** |